## रे.मु.नं.२१/२०१६ मधील नि. ७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने त्याचे घरासमोर प्रतिवादीने त्याचे जागेमध्ये बसविलेला जनरेटर दावा निकाल होईपर्यंतचे काळात चालु ठेवु नये व त्याअनुषंगाने प्रतिवादीला तुर्तातुर्त ताकिद देवविणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने कथन केले आहे की, मौजे आंबोळगड ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथे त्याची सर्व्हे नंबर १४ हिस्सा नंबर ६/१२ अशी जमीन मिळकत असून त्यामध्ये त्याचे ग्रामपंचायत घर कमांक २१४ आहे. तथापि, त्याचे घरासमोर प्रतिवादींचे वहिवाटीची जागा असून त्यामध्ये प्रतिवादीचा हॉटेल बीच रिसॉर्ट या नावाचा हॉटेल व्यवसाय आहे. जुलै २०१५ मध्ये प्रतिवादीने त्यांचे घरासमार सुमारे ४ ते ५ मीटर अंतरावर मोठा जनरेटर बसविला आहे व त्यापासुन त्यांना उपद्रव सुरु झाला आहे.

३. आंबोळगड गावामध्ये दिवसातुन असंख्यवेळा वीज सारखी येत जात असते. त्यावेळी जनरेटर सुरु होताना आणि बंद होताना त्याचा प्रचंड आवाज होतो व त्यामुळे जमीनसुध्दा हादरते. त्यामुळे त्याचे घराच्या भिंतींना ठिकठिकाणी तडे गेले आहेत. सदर जनरेटर सतत चालु बंद होत असल्याने रात्रीचेवेळी सलग झोप मिळत नाही. सततचे आवाजामुळे त्यांना निट दिसेनासे झाले आहे. सदर जनरेटरच्या आवाजामुळे त्यांचे व त्यांच्या पत्नीचे स्वास्थ्य निघुन गेले आहे. त्यांना गरगरणे व पित्ताचा त्रास सुरु झाला आहे. सदर जनरेटरच्या आवाजामुळे त्यांना शांतपणे जगणे अशक्य झाले आहे.

४. जुलै २०१५ पासून अलिकडेपर्यंत त्यांनी ग्रामपंचायत, तंटामुक्तीसमिती, तहसिलदार, पोलीसस्टेशन व लोकशाही दिन या ठिकाणी वेगवेगळया तकारी दिल्या आहेत. त्यानुसार काही वेळा काही माणसे येउन जनरेटर दुरुस्त करण्याचा प्रयत्न झाला होता परंतु प्रतिवादींनी जनरेटरचा वापर बंद झालेला नाही व उपद्रव चालुच आहे.

५. प्रस्तुतचा दावा निकाल होण्यामध्ये बराच अवधी असल्याने

सदर जनरेटरपासून होणारा उपद्रव सुरु राहिल्यास त्यांचे प्रकृतीवर परिणाम होणार आहे. तसेच त्यांचे घराचेही नुकसान होउन घर पडण्याची शक्यता आहे. सबब दावा निकाल होईपर्यंतचे काळामध्ये प्रतिवादीने जनरेटर चालु ठेवु नये अशी तुर्तातुर्त मनाई ताकिद प्रतिवादीला व्हावी अशी विनंती केली आहे.

**६.** प्रतिवादीनी निशाणी ४४ येथे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये वादीच्या अर्जामधील सर्व मजकूर नाकारला आहे. प्रतिवादीने पुढे कथन केले आहे की, मौजे आंबोळगड येथील सर्व्हे नं.१४ हिस्सा नं. २ या मिळकतीमध्ये त्याचे राहते घर आहे. शासनाचे कोकणातील पर्यटन विकासाचे धोरणास अनुसरुन ते न्याहारी–निवास योजना अंतर्गत येणा–या प्रवाश्यांची राहण्याची व जेवणाची सोय करतात. वादी जनरेटरबाबत करीत असलेल्या तक्रारी चुकीच्या आहेत.

**७.** त्यांनी बसवलेला जनरेटर हा त्याबाबतच्या आवश्यक मानांकनाची योग्य ती पूर्तता करुन बसवलेला आहे. तो जनरेटर वादीच्या घरापासून योग्य अंतरावर आहे. सदर जनरेटरचा आवाज अगर त्याच्या कंपनामुळे वादीला कोणताही त्रास होणे शक्य नाही. सदरच्या जनरेटच्या आवाजामुळे वादीचे स्वास्थ्य बिघडल्याबाबत केलेल्या तक्रारी खोटया आहेत. सदरच्या जनरेटरमुळे वादीला कोणताही त्रास, उपद्रव अथवा नुकसान होत नाही. वादीने ज्या गोष्टीबाबत दाद मागितली आहे त्याचे योग्य वर्णन दाव्यात दिलेले नाही. सबब प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर करणेत यावा.

**८.** वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे तसेच अभिलेखावरील कागद यांचे अवलोकनार्थ पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ असून त्याखाली त्याची कारणे मी नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथम दर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | सदरचा अर्ज नामंजूर झालेस वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ४ करीता

९. वादीने प्रस्तुतचा अर्ज मुख्यत्वे प्रतिवादीच्या जागेमध्ये असलेल्या जनरेटरच्या आवाजामुळे त्यांना व त्यांच्या पत्नीला प्रकृती अस्वास्थ्य झाले आहे. तसेच त्यांच्या घराला त्या जनरेटरच्या कंपनामुळे तडे गेले आहेत. व प्रस्तुतचा दावा निकाली होईपर्यंतच्या कालावधीमध्ये त्यांना त्यांचे प्रकृती अस्वास्थ्याची व त्यांच्या घराचे अधिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

१०. प्रतिवादींनी त्यांच्या जागेमध्ये जनरेटर असल्याची बाब विवादीत केलेली नाही. तथापि, प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने वादीने सकृतदर्शनी त्यांची बाजू सिध्द करणे आवश्यक आहे. तथापि, वादीने सदर जनरेटरच्या आवाजामुळेच त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादीच्या जागेमध्ये असलेल्या जनरेटरच्या कंपनामुळेच त्यांच्या घराला तडे गेले आहेत असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वादीने त्याचे कथनांचे पुष्टयर्थ दाखल केलेली निशाणी ३३ अनुक्रमांक ३ ते ६ येथील छायाचित्रे त्याच्याच घर क्र. २१४ मधील आहेत याचा बोध होत नाही. जरी वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदरच्या छायाचित्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे त्याच्या घरामध्ये तडे गेले आहेत असे गृहित धरले तरी ते तडे प्रतिवादीच्या जनरेटरच्या कंपनामुळे गेले आहेत असे दर्शविणारा सकृतदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. तसेच वादीने त्याचे घर क्र. २१४ कधी बांधले आहे व ते किती

सालापासून अस्तित्वात आहे त्याचा तपशील नमूद केलेला नाही. त्यामुळे छायाचित्रात दर्शविण्यात आलेले तडे वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीने जुलै २०१५ मध्ये जनरेटर बसविल्यापासून होणा—या कंपनामुळेच निर्माण झाले आहेत असा निष्कर्ष काढणे क्रमप्राप्त होणार नाही.

**११.** वादीने युक्तिवादावेळी निशाणी ४० येथील न्यायालयीलन आयुक्त यांनी दाखल केलेल्या अहवालाचा आधार घेवून युक्तिवाद केला की, सदर जनरेटरचा आवाज विहित मर्यादेपेक्षा म्हणजेच ५५ डेसिबलपेक्षा जास्त आहे. तथापि, सदरच्या अहवालाचे सखोल अवलोकन केले असता त्यामध्ये पुढे नमूद केले आहे की, ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण २०००) च्या सुधारीत नियमानुसार सदर ठिकाणी आवाजाचे मोजमाप ६५ डेसिबलपेक्षा जास्त दिसून आले नाही.

**१२.** वादीने त्याचे कथनाचे पुष्टयर्थ निशाणी २९ अनुक्रमांक १ ते ४ येथे त्यांच्या वाडीत राहणा—या ४ आसामींची प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा जनरेटर बंद आणि सुरु होताना त्याचा प्रचंड आवाज होतो आणि जमिन हादरते व त्या कंपनामुळे वादीचे घराचे भिंतींना तडे गेले आहेत. सदरचा जनरेटर सारखा चालू—बंद होत असल्याने दिवस—रात्र त्याचे आवाज सुरु असतात. तथापि, वर नमूद केलेप्रमाणे वादी याचे घर किती जुने आहे व ते कसे बांधले आहे याचा पुरावा देखील अभिलेखावर असणे क्रमप्राप्त आहे.

**१३.** सदर अर्जाच्या अनुशंगाने वादीने त्याच्या व त्याच्या पत्नीच्या प्रकृतीवर झालेला परिणाम हा सदर जनरेटरच्या आवाजामुळे झाला आहे असे दर्शविणारा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही, तसेच, वादी कथन करतो त्याप्रमाणे सदर जनरेटरच्या कंपनामुळे त्याच्या घराला तडे गेले आहेत असे दर्शविणारा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्या अनुषंगाने वर नमूद केलेप्रमाणे वादीचे घर कधी बांधले आहे व ते किती जुने आहे तसेच ते घर कशा

पध्दतीने बांधले आहे याचा देखील विचार होणे आवश्यक आहे. व सदरच्या बाबी या पुराव्याचे वेळीच ठरणार आहेत.

**१४.** सबब वर नमूद चर्चेच्या अनुशंगाने वादीने सकृतदर्शनी त्याची बाजू सिध्द केलेली नाही. सद्य:स्थितीत वादीने त्याचे कथनांचे पुष्टयर्थ कोणताही पुरावा दाखल केलेला नाही त्यामुळे न्यायाचा समतोल वादीचे हक्कात दिसून येत नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व मुद्दा क्रमांक ४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारीत करतो,

## आदेश

वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

**ठिकाण : राजापूर** **(ए.ए.कुलकर्णी)**
**दिनांक : ०५/०३/२०२०** **सह दिवाणी न्यायाधीश, राजापूर**